(CNR NO.MHNS1300019422022)

नियमित दिवाणी दावा क्र. ३७/२०२२
सुरेखा विधाते ..वि..भानुदास खोडे वगैरे

## निशाणी क्र.२४ खालील आदेश

प्रस्तूत अर्ज हा वादी यांनी प्रतिवादीने दाखल केलेल्या प्रतिदाव्यास कैफियत दाखल करणेकामी झालेला विलंब माफ होवुन मिळणेकामी केलेला आहे. वादी पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी असे कथन केले की, वादी व प्रतिवादींचे दरम्यानचे विविध वाद सामंजस्याने काही तडजोड होवु शकते का याची खातरजमा उभयतांचे नातेवाईक व हितचिंतक यांचेमार्फत करणेत आली. परीणामी वादीतर्फे प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. वादीतर्फे झालेला विलंब हा संयुक्तीक व योग्य अशा कारणास्तव झालेला आहे. सबब, अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यास हरकत घेतलेली आहे.

४. वादीस प्रतिदाव्यास जबाब/कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वाद विषय हा स्थावर मिळकतीबाबतचा आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे

न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे वादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश:

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना प्रतिदाव्याची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.03.11 17:27:53 +0530

(पी.डी. कोळेकर)

दिनांकः– ११ /०३/२०२५

दिवाणी न्यायाधिश क. स्तर.,
पिंपळगांव बसवंत